# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०३/०४/२०२४ (बुधवार) दुपार**

---

## अवैधरीत्या देशी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसाची कारवाई

दि. ०२/०४/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन नरखेड हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मुखबिरद्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील मौजा मोवाड ते जलालखेडा रोडनी दुचाकी वाहनाने अवैद्य देशी दारू बाळगून अवैध वाहतूक होत आहे. अशा माहिती वरून मौजा मोवाड ते जलालखेडा रोड येथे नाकाबंदी केली असता होंडा एक्टीवा मोपेड वाहन क्र. एम.एच–४०/सी.पी.–४३७७ ने अवैद्यरीत्या दारू वाहतूक करणारा **आरोपी नामे–शैलेश ईश्वरी बिलगया, वय ४० वर्ष रा. मोवड तह. नरखेड जि. नागपूर** याच्या ताब्यातून विनापरवाना व अवैधरीत्या १) १०० नग देशी दारू निपा प्रत्येकी ९० ml च्या किंमती ३५००/–रू. २) होंडा एक्टीवा मोपेड वाहन किंमती ५०,०००/–रु असा एकूण ५३,५००/– रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला. जप्त मुद्देमाल व आरोपी यांना पुढील कायदेशीर कारवाईकरीता पोलीस स्टेशन नरखेड यांच्या ताब्यात देण्यात आले. आरोपीविरूद्ध पोस्टे नरखेड येथे कलम ६५अ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनी आशिष ठाकूर, Asi चंद्रशेखर गडेकर, HC प्रमोद तभाने, Hc संजय बांते यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर